# <u>जिल्हा न्यायालय भरती प्रक्रिया –२०२३</u>

## <u>जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदुर्ग</u>

## <u>सूचना</u>

जिल्हा न्यायालय भरती प्रक्रिया २०२३ अंतर्गत जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग चे आस्थापनेसाठी ''शिपाई'' पदासाठी निवडसूची /प्रतिक्षायादी तयार करणेसाठी ना. उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेल्या सूचीबध्द उमेदवारांपैकी चाळणी परीक्षेद्वारे पात्र ठरलेल्या उमेदवारांची दिनांक ०८/०८/२०२४ व ०९/०८/२०२४ रोजी स्वच्छता व चापल्यता चाचणी घेणेत आलेली होती. सदर चाचणी व चाळणी परीक्षा याद्वारे उमेदवारांनी प्राप्त केलेले गुण यावर आधारीत पात्र उमेदवारांची दिनांक १२/०८/२०२४ ते १४/०८/२०२४ या कालावधीत खालील नमुद वेळापत्रकाप्रमाणे <u>जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग येथे मुलाखत घेणेत येणार आहे.</u>

| अ.क्र. | मुलाखती साठी पात्र उमेदवारांच्या यादीतील अनुक्रमांक | मुलाखतीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | १ ते २५ | १२/०८/२०२४ |
| २ | २६ ते ५० | १३/०८/२०२४ |
| ३ | ५१ ते ७८ | १४/०८/२०२४ |

तरी मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहीतीस व जाहीरातीत नमुद ''उमेदवारांसाठी सामाईक सूचना'' मधील अ.क्र. ०५(ग) कडील सुचनेस अनुसरुन प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती आणि मुळ प्रमाणपत्रे घेवून वर नमुद दिनांकास दुपारी **<u>०१.०० वाजता</u>** जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग येथे उपस्थित रहावे. सर्व उमेदवारांच्या मुळ प्रमाणपत्रांची व साक्षांकित प्रतींची पडताळणी पूर्ण झाल्यावरच मुलाखतीस सुरुवात करणेत येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग चे अधिकृत संकेतस्थळ 'https://districts.ecourts.gov.in/sindhudurg' वर आणि सिंधुदुर्ग जिल्हा न्यायालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करणेत आलेली आहे. तरी पात्र उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

10/8/2024

जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग.
दिनांक :– १०/०८/२०२४.

( एच्. बी. गायकवाड )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
<u>सिंधुदुर्ग–ओरोस.</u>